# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०–२५६२१०४८/४९
ई–मेल
iqac@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष


संदर्भ : आयक्युएसी/३२५

दिनांक : २८ जानेवारी,२०२३

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/सर्व स्वायत्त महाविद्यालये,

पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा व दादरा–नगर हवेली,

प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय – शासकीय/अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पूर्नमूल्यांकन व मानांकनाबाबत.**

संदर्भ – १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०) विशि–३ दि. ०८/१०/२०१०.

२. मा. संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि–३/१०१०० दिनांक २७/०७/२०२२.

३. मा. प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र शासन, पुणे–०१ यांचे जा.पत्र क्र.एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म. वि/औवि/मवि–३/६७८ दि. २५/०१/२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा. संचालनालयाचे संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांनी अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये यांना नॅक मुल्यांकन/पूर्नमूल्यांकन करून घेणेबाबत वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, सुचनापत्र निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन प्रक्रीय सहभाग घेऊन नॅक कडून "नॅक मान्यतेचा दर्जा" प्राप्त करून घेतलेला आहे.

प्रस्तुत विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व संबधित संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/सर्व स्वायत्त महाविद्यालये नॅक मुल्यांकनास पात्र असुन, त्यांची नॅक मुल्यांकनाची वैधता संपुष्टात आली आहे, व त्यापुढील Cycle अंतर्गत महाविद्यालयांचे पुर्नमुल्यांकन व मानांकन करून घेतलेले नाही अशा संलग्न महाविद्यालयांनी राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. तथापि, बहूतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक मूल्यांकन केले नसणे व पूर्नमूल्यांकन वैधता कालावधी समाप्त झाला असल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरून निदर्शनास आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मुल्यांकन व पुनर्मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन व पुनर्मूल्यांकन करून घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्टया योग्य नाही. यास्तव सर्व संबधित महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरू करून **दि. ३१ मार्च,२०२३** पर्यंत नॅक मुल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करून IIQA Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल, असे मा. संचालनालयाच्या आदेशान्वये सुचित केलेले आहे.

सोबत जोडलेल्या पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून त्यानुसार आपण आपल्या स्तरावरून त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करून व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तुत विद्यापीठास **दि. १५ मार्च, २०२३** पूर्वी अवगत करावा, ही विनंती.

आपला,

**(श्री. श्रीकांत गायकवाड)**
सहायक कुलसचिव

सोबत:— मा. संचालनालयाचे पत्र

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
विद्यापीठ
25/1/2023
आवक क्रमांक 624
टिपणी क्रमांक 25/01/2023

एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 678 दि. .०१.२०२३

25 JAN 2023

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य.

प्राचार्य/संचालक शासकीय महाविद्यालये/संस्था.

**विषय -शासकीय / अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन / पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

Dir, IQAC
Hon'ble PVC office

**संदर्भ -** १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२ व दि.०३. १०.२०२२.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र १ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक मूल्यांकन केले नसणे व पुनर्मूल्यांकन वैधता कालावधी समाप्त झाला असल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्टया योग्य नाही. यास्तव सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल.

प्रस्तुतची बाब विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायमविना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांचे अध्यक्ष व प्राचार्य यांना व्यक्तिशः अवगत करावी. तसेच केलेली कार्यवाही संचालनालयास अवगत करावी.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत- कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना माहिती व कार्यवाहीसाठी**
२/- त्यांना कळविण्यात येते की, विषयांकित प्रकरणी आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.०७ एप्रिल, २०२३ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२